**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1788/2007.**

श्री भास्कर रामभाउजी टिपले
समाधी वार्ड चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री डी. एस. चिलमुलवार
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपायुक्त, सा. प्र.,
नगरपालिका प्रशासन नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
मुख्याधिकारी, नगर परिषद चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 19.7.2008 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 7.5.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी गैरहजर. त्यांचे प्रतिनिधी म्हणून श्री बी. वाय. ठाकरे हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 2.12.2006 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद चंद्रपूर यांचेकडे चंद्रपूर शहरात लग्न संमारंभ व इतर समारंभासाठी वापरत

असलेल्या इमारतीबाबत. माहिती संबंधी कालावधी सन 1980 ते आज डिसेंबर 2006 पर्यंत. आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन –

1. चंद्रपूर शहरात ज्या इमारतीमध्ये लग्न संमारंभ व इतर समारंभासाठी वापरण्यात येत असलेल्या इमारतींची यादी

2. चंद्रपूर शहरात ज्या इमारतीमध्ये लग्न संमारंभ व इतर समारंभासाठी वापर करण्या करीता परवानगी दिलेल्या इमारतीची माहिती

3. चंद्रपूर शहरात ज्या इमारतीमध्ये लग्न संमारंभ व इतर समारंभासाठी इमारतींना बांधकामासाठी दिलेल्या परवानगीची यादी.

4. तसेच ज्या इमारतींना बांधकामासाठी न दिलेल्या परवानगीची यादी.

5. तसेच चंद्रपूर शहरातील ज्या इमारतीमध्ये लग्न संमारंभ व इतर समारंभासाठी वापर करीत असून किती इमारतींना पार्किंगची व्यवस्था असलेल्या इमारतींची माहिती.

माहिती प्रत्यक्ष पाहिजे असे नमूद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 2.1.2007 रोजी सहा. माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना सदर माहिती अभिलेख्यात आढळुन आली नाही असे कळविलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 15.1.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या निर्णय दि. 17.2.2007 रोजी दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयामध्ये ''अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अजुनही प्राप्त झालेली नाही तसेच प्रतिवादीने माहिती अपिलार्थीने दिलेल्या यादीनुसार माहिती पुरविण्याचे मान्य केल्यामुळे अपिलार्थी यांनी दि. 2.12.2006 अन्वये मागणी केलेली माहिती हा आदेश प्राप्त पासून 7 दिवसाचे आंत विनामुल्य पुरविण्यास निर्देशित करीत आहे असा निर्णय देवून अपील निकाली काढलेले दिसून येते. सदरच्या निर्णया नतर सुध्दा अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी दि. 2.12.2006 च्या अर्जामध्ये मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी यांचेकडे 51 इमारतींची यादी उपलब्ध करुन दिलेली होती असे प्रथम अपीलाच्या निर्णयातून दिसून येते. त्यावेळेस तरी सदरची माहिती उपलब्ध करुन द्यावयास पाहिजे होती. व प्रथम अपीलाच्या निर्णया मधील निष्कर्षामध्ये सुध्दा नगर परिषद प्रॉपर्टी टॅक्स वसूल नेहमी करीत असल्यामुळे माहिती अभिलेख्यात नाही असा युक्तीवाद केला तो बरोबर नाही व त्यामुळेच अपिलार्थीने दिलेले यादीनुसार माहिती देणे मान्य केलेले दिसून येते. वास्तविक अपीलार्थी यांनी जी माहिती मागितली त्या माहितीच्या संदर्भामध्ये नगर परिषदेमध्ये माहिती तयार असावयास पाहिजे होती. कोणत्याही शहरामध्ये बांधकामाच्या संदर्भामध्ये महाराष्ट्र नगर रचना अधिनियम 1966 प्रमाणे बांधकाम झाले किंवा नाही याबाबतची परवानगी देणे आवश्यक असते. व हे गृहित धरुनच प्रत्येक इमारतीच्या संदर्भामध्ये स्वतंत्र अशी नस्ती असणे आवश्यक असते. व त्यामुळे सदरची माहिती उपलब्ध नाही असेच उत्तर देणे किंवा नगर परिषद हे एकच सार्वजनिक प्राधिकरण असल्यामुळे व माहिती अधिकारी हे मुख्याधिकारी असल्यामुळे सदरील माहिती नगर रचना विभाग नगर परिषद चंद्रपूर यांचेशी संबंधित आहे असे त्याच नगर परिषदेतील सहा. माहिती अधिकारी यांनी सांगणे याचा अर्थ माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटळ करणे असा होतो. व त्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी हे अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे दोषी आढळुन येतात व शास्तीस पात्र आहेत. मुख्याधिकारी नगर परिषद चंद्रपूर यांनी आयुक्त तथा नगर परिषद संचालक यांचेकडे दाखल केलेला सुध्दा खुलासा दिशाभूल करणारा दिसून येतो. ‘‘अर्जदारास याबाबत निश्चित माहिती घेण्यासाठी कार्यालयीन वेळेत येण्याबाबत अर्जदारास कळविले होते. तथापी आज पावेता सुध्दा अर्जदार न आल्याने त्यांना हवी असलेली माहिती देता आली नाही असे खुलाशात म्हटलेले दिसते. त्याकरीता कोणत्याही प्रकारचे पत्र प्रथम अपीलीय अधिकारी किंवा आयोगाकडे पुरावा म्हणून सादर

केलेला दिसून येत नाही. उलट 3.4.2007 रोजी भास्कर रामभाऊ या नावानी टिपले अर्जदार यांनी मुख्याधिकारी यांना स्मरणपत्र दिलेले दिसते. व ते आवक लिपीक नगर परिषद चंद्रपूर यांनी स्विकारलेले दिसून येते. यावरुन प्रथम अपीलीय अधिकारी तसेच आयोगाची सुध्दा दिशाभूल करण्याचा प्रयत्न नगर परिषदेचे कर्मचारी करतात असे दिसून येते. व त्यामुळे वर नमुद केल्याप्रमाणे संबंधित जन माहिती अधिकारी तसेच संबंधित कर्मचारी हे दोषी आढळून येत आहेत. आयोगाकडे दिलेल्या खुलाशामध्ये आवेदकाने सदर माहितीचा कालावधी सन 1980 ते डिसेंबर 2006 पर्यंत त्यांच्या अर्जात दिलेला आहे. तसेच इमारत मालकाचे नांव, प्लॉट नं. शिट नं., ब्लॉक नं., सर्व्हे नं., साधारण मंजुरीचे वर्ष अशी स्पष्ट माहिती अर्जात नमुद केलेली नसल्याने व सदर माहिती वेगळया स्वरुपात उपलब्ध नसल्याने सदर माहितीचे अभिलेखातून शोध करुन ती आवेदकास पुरविण्यास अडचण निर्माण झालेली असल्याने माहिती पुरविणे शक्य झालेले नाही. परंतु हाच खुलासा उत्तर म्हणून अर्जदारास सुरुवातीच दिला असता तर त्याबाबत अर्जदाराना सुध्दा माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने तपशिल देणे आवश्यक झाले असते. परंतु दि. 2.1.2007 व 22.1.2007 चे उत्तर हे माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी टाळाटाळ करण्याचा उत्तम नमुना आहे. याचा अर्थ आयोगानी दि. 2. 6.2008 रोजी नोटिस काढल्यानंतरच माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता हालचाल करण्यात आली आहे असा निष्कर्ष काढावा लागातो. उपलब्ध झालेली माहिती यामध्ये माहिती बरोबर नाही असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. व त्याही करीता अधिनियमाचे कलम 20 (1) प्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केली असा निष्कर्ष काढावा लागातो. माहिती अधिकारी यांना नोटिस काढुनही ते हजर झाले नाहीत त्यावरुन त्यांना पुरेपुर संधी दिली आहे. व त्याकरीतासुध्दा अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून त्यांना दि. 16.7.2008 रोजी उपलब्ध करुन दिलेली माहिती ही उपलब्ध असलेल्या अभिलेख्यावरुन सुधारीत करुन देण्यात यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे प्रत्यक्ष संपर्क साधून माहिती तपासून सुधारीत करुन घ्यावी.

2) संबंधित जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलाचा निर्णय दिल्यानंयतर जे माहिती अधिकारी असतील तसेच दि. 2.1.2007 व 22.1.2007 रोजी ज्या सहा. माहिती अधिका–यानी उत्तर दिलेले आहे ते सहा. माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली असल्यामुळे अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे दोषी आढळुन येत असल्यामुळे त्यांचे विरुध्द रु. 25000/– ची शास्ती ही लादण्यात येत लादण्यात येत असून सदरच्या शास्तीची वसुली प्रादेशिक संचालक नगर परिषद यांनी तत्कालीन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, सहा. माहिती अधिकारी व इतर कर्मचारी यांची जबाबदारी निश्चित करुन त्यांचे दरमहाचे वेतनातून वसुल करुन लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये भरणा करावा.

3) अधिनियमाच्या कलम 19 (5) प्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही ही सिध्द करण्याची जबाबदारी जन माहिती अधिकारी यांची आहे व त्या अनुषंगाने अधिनियमाच्या कलम 20 प्रमाणे जन माहिती अधिकारी हे शास्तीस जबाबदार

असतात व त्यामुळे त्यांनी द्वितीय अपीलाच्या सुनावणीस स्वतः हजर राहणे बंधनकारक आहे व त्याकरीता विद्यमान माहिती अधिकारी यांना सुध्दा ताकीद देण्यात येत आहे.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर<br>
दि. 19.7.2008

( विलास पाटील )<br>
राज्य माहिती आयुक्त,<br>
विदर्भ क्षेत्र, नागपूर.